# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


<u>पत्र</u>

विषयः- एलिफंटा या पर्यटन स्थळाचा पर्यटनदृष्टया विकास करणे. मौजे घारापुरी येथे विज पुरवठा करणेबाबत वनक्षेत्र मागणी प्रस्ताव.

जा. क्र. ब/20/जमीन/ 2190 /2017-18.
अलिबाग 402 201. दिनांकः 19 /08/2017.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कं. लि.,
भिंगारी, पो. ता. पनवेल.

संदर्भः- 1) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/ 1575 दिनांक 04/07/2017.

2) आपलेकडील पत्र क्र. EE/PNL-U/2017-18/TECH/CAMP ALIBAG दिनांक 17/07/2017.

3) आपलेकडील पत्र क्र. EE/PNL-U/TECH/3233 दिनांक 11/08/2017.

"एलिफंटा या पर्यटन स्थळाचा पर्यटनदृष्टया विकास करणे" या प्रकल्पाकरीता मौजे घारापुरी येथे विज पुरवठा करणेसाठी आपले विभागाकडून भूमिगत केबल टाकणेसाठी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत प्रस्ताव संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये या कार्यालयात 1 प्रतीत दाखल करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव ऑन प्रणालीवर देखील दाखल आहे. प्रस्तुत प्रस्तावामध्ये तातडीने कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. करीता निम्नस्वाक्षरीकर्ता सदर प्रस्तावीत क्षेत्राची स्थळ पहाणी दिनांक 21/08/2017 रोजी करणार आहेत. तरी आपण अथवा आपले माहितगार प्रतिनिधीस जरुरते कागदपत्र/माहिती यासह स्थळ पहाणीचे दिवशी उपस्थित रहावे किंवा सुचना दयाव्यात ही विनंती.

या कार्यालयात आपणाकडून 1 प्रतीत सादर करणेत आलेल्या प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहेत.

1. वनजमीन मागणी केलेल्या क्षेत्राचे 7/12 प्रस्तावामध्ये समाविष्ठ केलेले नाहीत. तरी प्रस्तावांत 7/12 उतारा व आंग्ल भाषेंत भाषांतरीत केलेले 7/12 उतारा सामील करणेत यावेत.
2. प्रस्तावामध्ये अस्तित्वातील इलेक्ट्रिक लाईन नकाशावर दर्शविणेत आलेले नाही. तसेच इलेक्ट्रिक पुरवठा कोणत्या मार्गाने घारापुरी येथे येणार आहे तसेच सदर इलेक्ट्रिक

लाईन अंतर्गत कांदळवन क्षेत्र अंतर्भूत होत असल्यास सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

3. प्रस्तावामध्ये पान क्र. 41 वर स.क्र. 40ब, 38, 35, 66 चे क्षेत्राचा वैधानिक दर्जा अवर्गीकृत वन असा दर्शविलेला आहे. तर नकाशामध्ये सदर क्षेत्राचा दर्जा राखीव वनाचा दर्शविणेत आलेला आहे. त्याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे वनक्षेत्र हे भारतीय वन अधिनियम, 1927 चे कलम 4 अंतर्गत राखीव वन म्हणून अधिसुचीत आहे.

4. प्रस्तावामध्ये कंट्रोल रुम म्हणून नकाशामध्ये सुचीमध्ये उल्लेख केलेला आहे. तथापी कंट्रोल रुम करीता आवश्यक वनक्षेत्र/वनेत्तर क्षेत्राचा तपशिल प्रस्तावामध्ये देणेत आलेला नाही. सदर क्षेत्रांत वनक्षेत्र बाधीत होत असल्यास वन जमीन मागणी प्रस्तावामध्ये सदर क्षेत्र अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

5. प्रस्तावामध्ये वनहक्क कायदा-2006 अंतर्गत जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील प्रमाणपत्र समाविष्ठ नाही.

6. प्रस्तावांतील चेकलिस्ट वर प्रस्तावांत सामील असलेल्या दस्तऐवजांचे पान क्रमांक नमुद करावेत.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव 7 प्रतीत या कार्यालयात दाखल करणेस विनंती आहे.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व वनक्षेत्रपाल उरण यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी दिनांक 21/08/2017 रोजी प्रस्तावीत स्थळ तपासणीचे वेळी आवश्यकत्या माहितीसह संबंधीत क्षेत्रय कर्मचारी यांचेसह उपस्थित रहावे.

प्रतः- श्री. एस्.जे. नांदगांवकर, वनक्षेत्र सर्व्हेक्षक यांचेकडे माहितीसाठी व स्थळ तपासणी चे वेळी आवश्यकत्या माहितीसह उपस्थित रहाणेकरीता रवाना.